**"मार्च २०२०" या महिन्यात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालयामधील सेवा उपविभागाने घेतलेल्या महत्त्वाच्या निर्णयांची संक्षिप्त माहिती ...**

**(क) मंत्रालयीन संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची बदली / मुदतपूर्व बदली / बदलीस स्थगिती / बदली रद्द / पदस्थापनेत बदल / कार्यमुक्त / प्रतिनियुक्ती / प्रतिनियुक्तीस मुदतवाढ / प्रत्यावर्तन / पदोन्नती / पदावनती / मानीव दिनांक व नियमित दिनांक इत्यादींच्या आदेशांचा तपशील ...**

- भारतीय प्रशासन सेवेतील १ अधिकाऱ्याची बदली करण्यात आली आहे.
- अवर सचिव-१, सहायक कक्ष अधिकारी-५, लिपिक टंकलेखक-१ अशा ७ अधिकारी / कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली आहे.
- एका अवर सचिवाचे प्रत्यावर्तन करण्यात आले आहे.
- एका अवर सचिव प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.
- एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम-५ अंतर्गत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा (मुख्य) परीक्षा २०१७ व्दारे मंत्रालयीन कक्ष अधिकारी पदासाठी शिफारस केलेल्या १२ उमेदवारांना दोन वर्षांच्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन अधिकारी म्हणून तात्पुरती नियुक्ती देण्यात आली आहे.

**(ख) शासन निर्णय / अधिसूचना**

- दिनांक ३ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) व या विभागांतर्गत अन्य पाच कार्यालयाच्या आस्थापनेवरील ३१५ अस्थायी पदांना दिनांक ३१ ऑगस्ट २०२० पर्यंत पुढे चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ३ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये सामान्य प्रशासन विभाग (खुद्द) साठी ५० प्रिंटर्स व ५० स्कॅनर्स खरेदीसाठी झालेल्या रु.१९,३९,४५०/- इतक्या खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.
- दिनांक ४ मार्च २०२० च्या शासन पत्रान्वये गट-क व गट-ड कर्मचाऱ्यांच्या विभागीय चोकशीसाठी कंत्राटी तत्त्वावर नियुक्तीसाठी इच्छुक सेवानिवृत्त चौकशी अधिकाऱ्यांची सामायिक यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.
- दिनांक ६ मार्च २०२० च्या शासन परिपत्रकान्वये वेतनश्रेणीच्या आधारे पदांचे गटनिहाय वर्गीकरण न करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
- दिनांक ९ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील नियम-२३ मधील तरतुदीनुसार मंत्रालय उपाहारगृहे कार्यालयांतर्गत प्रशासन अधिकार, मंत्रालय उपाहारगृहे यांना तक्रार निवारण अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.
- दिनांक ९ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वसंतराव नाईक राज्य कृषि विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था (वनामती), नागपूर या प्रशिक्षण संस्थेस सन २०१९-२० करिता एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमासाठी सहायक अनुदान (वेतन) व (वेतनेतर) या उद्दिष्टांखाली अनुक्रमे रु.१२,८९,८००/- व रु.१,३८,६०,०००/- अशा एकूण रु.१,५१,४९,८००/- इतकी रक्कम वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
- दिनांक १९ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी, पुणे या संस्थेस ऑगस्ट २०१९ ते फेब्रुवारी २०२० या सात महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (प्रशिक्षण शुल्क) रु.१२०.०० लाख इतके सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.
- दिनांक १९ मार्च २०२० च्या शासन निर्णयान्वये मराठवाडा प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी, नाथनगर, उत्तर पैठण, औरंगाबाद या संस्थेस ऑगस्ट २०१९ ते फेब्रुवारी २०२० या सात महिन्यांकरिता अनिवार्य खर्चासाठी (वेतनेतर) रु.२.५० लाख इतके सहायक अनुदान (अंतिम हप्ता) मंजूर करण्यात आला आहे.

**(ग) प्रशिक्षण / परीक्षा**

- दिनांक ३ मार्च २०२० च्या शासन परिपत्रकान्वये "मंत्रालयीन विभागातील लिपिक / लिपिक-टंकलेखकाचे सेवाप्रवेशोत्तर प्रशिक्षण परीक्षा सन २०२०" करिता दिनांक २० मार्च २०२० पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहे.